शिल्पकार विकासाचा...

# देशदूत

इंटरनेट आवृत्ती www.deshdoot.com | धुळे | वर्ष २८ । अंक २४३ । सोमवार, दि.२३ जून २०२५ । पाने-८ | किंमत ₹ ५ | मोबाईल आवृत्ती वाचा व वर

## अबू आझमींच्या विधानाने वादंग

**मुंबई ।** संत ज्ञानेश्वर महाराज आणि तुकाराम महाराजांची पालखी पंढरपूरकडे प्रस्थान करत आहे. असे असताना समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी यांचे वारीसंदर्भात एक विधान केले आहे. वारीमुळे रस्ता जाम होतो. हिंदूंचे सण साजरे केले जातात. तेव्हा मुसलमान व्यक्ती विरोध करत नाही. मात्र मुसलमानांनी नमाज पठण केल्यावर तक्रार केली जाते. मशिदीबाहेर नमाज पठण केले जाऊ देत नाही, असे समाजवादी पक्षाचे आमदार अबू आझमी म्हणाले आहेत.

## एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत होणार!

**मुंबई ।** राज्य परिवहन महामंडळाचा सुमारे १० हजार कोटी संचित तोटा आहे. त्याचवेळी सवलत मूल्य प्रतिपूर्ती रक्कमेपैकी एक हजार कोटी रुपये इतकी रक्कम राज्य सरकारने दिली नसल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेवर होत नाही. एसटी कर्मचाऱ्यांना वेतन वेळेत मिळण्यासाठी व इतर आर्थिक कामकाजासंदर्भातील एसटी महामंडळाची श्वेतपत्रिका सोमवारी जाहीर होणार आहे. त्यात एसटी कर्मचाऱ्यांचे वेतन वेळेत होण्यासाठी भरीव तरतूद केली जाणार आहे.

## संपादकीय

### ग्रामराज्याचा आदर्श

लोकसहभाग हा सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम मानले जाते. लोकसहभाग बदलांची पाऊलवाट प्रशस्त करतो. नव्हे तो ग्रामसुधारणेचा मूलमंत्र मानला जातो. त्याचे गमक संत तुकडोजी महाराज यांनी त्यांच्या ग्रामगीतेतून सांगितले आहे. ग्रामसुधारणेचा मूलमंत्र **। सज्जनांनी व्हावें एकत्र । संघटना हेंचि शक्तीचें सूत्र । ग्रामराज्य निर्माण करी ।।१७।।** त्यांचा हा उपदेश एका गावाने अंमलात आणला आहे. लोकसहभागातून गावाचे चित्र पालटले आहे. गावात हुंडाबंदी आहे. स्मशानभूमी उद्यानासारखी फुलवली आहे. मृत व्यक्तीची राख विसर्जन नदीत किंवा तलावात केले जात नाही. त्यांच्या शेतीत त्या व्यक्तीच्या नावे एक झाड लावले जाते. तिथे ती राख टाकली जाते. कुटुंबातील सदस्य झाड जगवतात. गावाने अजून एक कालसुसंगत आणि प्रागतिक निर्णय घेतला आहे. गावात एकूण १२० कुटुंबे राहतात. गावकऱ्यांनी मरणोत्तर देहदानाचा निर्णय घेतला आहे. आत्तापर्यंत १२ कुटुंबात तो अंमलातदेखील आला आहे. हे आटपाट नगरातील गावाचे वर्णन अजिबात नाही. लातूर जिल्ह्यातील आनंदवाडी गावात हे सगळे चमत्कार अनुभवायला मिळतात. माध्यमात त्याची कथा प्रसिद्ध झाली आहे. अवयवदानाच्या निश्चयाचे फळ व्यापक आहे. कारण देशात दरवर्षी सुमारे पाच लाखांपेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू अवयव वेळेवर न मिळाल्याने होतो. गरजू आणि दाते यांचे प्रमाण व्यस्तच आढळते. म्हणजे दात्यांच्या कैकपटीने गरजूंची संख्या आहे. एक व्यक्ती त्याचे किमान आठ अवयव दान करु शकते. म्हणजेच आठ गरजूंच्या आयुष्यात आनंदाची पहाट फुलवू शकते. अवयवदानाच्या प्रतीक्षेत व्यक्ती आणि तिचे कुटुंब असते. अकार्यक्षम अवयवासहित जगणे त्यांच्यासाठी वेदनादायी असते. आनंदवाडी गावाचा सामूहिक निर्णय सामाजिकदृष्ट्या किती महत्त्वाचा आहे हे यावरुन लक्षात येऊ शकेल. गावाच्या ग्रामपंचायतीत १०० टक्के महिलाराज आहे. बदलाचे वारे वाहण्याचे तेदेखील एक कारण मानले जाऊ शकेल. ममत्व, आपुलकी आणि एकमेकांविषयी जिव्हाळा ही महिलांची अंगभूत गुणवैशिष्टचे. पान २ वर

## आम्हा ध्यास पंढरीचा अपार.. दिवे घाटाची अवघड वाट पार



**पुणे । राजेंद्र पाटील ।** विठ्ठलाच्या नामाचा अखंड जयघोष करीत व भक्तीचे भारावलेपण घेऊन पंढरीच्या वाटेवर असलेल्या संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माउलींच्या पालखी सोहळ्याने लाखो वैष्णवांचा साथीने ज्येष्ठ कृष्ण योगिनी एकादशी रविवार दि.२२ जून रोजी दिवे घाटातील वारीच्या वाटेवरील सर्वात कठीण टप्पा पार केला. सुमारे दोन तास घाटातील वाटचाल पूर्ण करून सोहळा संध्याकाळी सासवड मुक्कामी दाखल झाला.

माउलींचा पालखी सोहळा पुण्यातून मार्गस्थ झाल्यानंतर दुपारी २ वा. वडकीनाला येथे विसाव्यासाठी थांबला. यावेळी वडकी ग्रामपंचायत व अनेक सार्वजनिक मंडळांनी अन्नदान केले. त्यानंतर दुपारी ३.३० वा. सर्वात अवघड टप्पा समजल्या जाणाऱ्या दिवेघाटातील वाटेने माऊलींच्या रथाचा प्रवास सुरू झाला. रथाला आकर्षक बैलजोड्या जुंपण्यात आल्या होत्या. वातावरण ढगाळ स्वरूपाचे,जोरदार वाहता वारा व हवेत काहीसा थंडावा असल्याने उन्हाचा त्रास झाला नाही. दिंडीतील वारकरी निरनिराळी पदे, अभंग, भारुडे,गौळणी म्हणताना दिसत होते. वारकऱ्यांमध्ये एक वेगळेच चैतन्य संचारले होते. वैष्णवांसंगती सुख वाटे जीवा आणिक मी देवा काही नेणे गाये नाचे उडे आपुलीया छंदे मनाच्या आवडीने असे अभंग म्हणत टाळ मृदंगाच्या तालावर माउली.. माउली.. हा अखंड जयघोष करत पालखी सोहळा पुढे सरकत होता. सारे जण विठू नामाच्या भक्तिरसात चिंब होऊन नाचत होते. दिवे घाट चढून पालखीने सायंकाळी ६.१५ वा. पुरंदर तालुक्यात प्रवेश केला. पुरंदर तालुक्यातील झेंडेवाडी येथील माऊलींच्या विसावा तळावर माऊलींची पालखी विसावली. या वेळी संध्याछाया दिवेघाट परिसरावर पडली होती. यावेळी झेंडेवाडी पंचक्रोशीतील सर्व नागरिकांनी माऊलींचे प्रचंड गर्दीत दर्शन घेतले घेतले.

## कर्तृत्वाचा मक्ता फक्त पुरुषांकडेच नाही!

### महिला धोरण त्रिदशकपूर्तीनिमित्त शरद पवारांचा नारा

**पुणे ।** प्रत्येक क्षेत्रात महिलांना आरक्षण दिले. लोकांना सुरुवातीला पटले नव्हते, पण शेवटी लोकांनी ते मान्य केले. कोणतेही बदल हिताचे करायचे असतात, नाराजी असते, पण समाजाचे हित असेल, तर ती नाराजी घ्यायची ताकद ठेवावी लागते. लोकांची मानसिकता बदलली असे सांगता येणार नाही. स्त्री आणि पुरुष कर्तृत्वाच्या बाबतीत कुठेही कमतरता नाही. कर्तृत्वाचा मक्ता फक्त पुरुषाकडे असतो, ही गोष्ट विसरायला पाहिजे, असे मत राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष आणि माजी केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांनी सांगितले.



यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने महिला धोरणाची त्रिदशकपूर्तीनिमित्त रविवारी यशस्विनी सन्मान सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी शरद पवार बोलत होते.

शरद पवार म्हणाले, महिलांसंदर्भात देशातील पहिले धोरण हे महाराष्ट्रात तयार केले गेले. पण निर्णय घेताना अनेक वेळेला कुठे ना कुठेतरी विरोध होत होता. मानसिकता बदलायची आवश्यकता होती. समाजातल्या पुरुषवर्गाची ती मानसिकता त्या काळात बदलली नव्हती. हल्ली सुद्धा तीच मानसिकता आपल्याला दैनंदिन जीवनामध्ये बघायला मिळते. त्यातले एक एक कलम, तरतूद याच्यासाठी तासन्तास चर्चा करावी लागली. त्याला ज्यांचा विरोध आहे त्यांना समजावून सांगावे लागले. काही कायद्यात दुरुस्ती करावी लागली. काही लहान प्रश्नांबाबतीतसुद्धा काही पुरुषांची मानसिकता ही पान २ वर

लोकांची मानसिकता बदलली असे सांगता येणार नाही. स्त्री आणि पुरुष कर्तृत्वाच्या बाबतीत कुठेही कमतरता नाही. कर्तृत्वाचा मक्ता फक्त पुरुषाकडे असतो, ही गोष्ट विसरायला पाहिजे. संधी मिळाली तर स्त्रीसुद्धा पडेल ती जबाबदारी घेऊ शकते. साधी गोष्ट आहे जुन्या पिढीतल्या लोकांना एक प्रश्न विचारला की, १९४७ सालापासून आजपर्यंत तुम्हाला देशामध्ये प्रभावीपणे निर्णय घेणारा प्रधानमंत्री कोण वाटतो? तर त्यांच्याकडून उत्तर येईल इंदिरा गांधी. इंदिरा गांधी यांनी कर्तृत्व दाखवले, देश चालवण्यासंबंधीची दृष्टी दाखविली. महिला हे करू शकतात, हा इतिहास त्यांनी घडविला. त्यामुळे कर्तृत्व हे दोघांच्यातही असते असे शरद पवार यांनी सांगितले.

## पहलगाम हल्ल्यात सहभागी दोघांना अटक

**श्रीनगर ।** जम्मू-काश्मीरमधील पहलगाममध्ये २२ एप्रिल रोजी दहशतवादी हल्ला झाला होता. या हल्ल्याबाबत राष्ट्रीय तपास संस्थेला मोठे यश मिळाले आहे. दहशतवाद्यांना आश्रय दिल्याच्या आरोपाखाली एनआयएने दोघांना अटक केली आहे. हे दोन्ही संशयित पहलगामचे रहिवासी आहेत. अटक केलेल्या दोघांची नावे परवेज अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर आहे. एनआयएला चौकशी दरम्यान तीन दहशतवाद्यांची ओळख पटली आहे. या तिघांचा संबंध बंदी घातलेल्या दहशतवादी गट लष्कर-ए-तैयबा सोबत आहे. हे तिन्ही जण पाकिस्तानी नागरिक आहेत. एनआयएच्या तपासानुसार, परवेझ आणि बशीर यांनी हल्ल्यापूर्वी हिल



पार्कमधील तात्पुरत्या झोपडीमध्ये दहशतवाद्यांना आश्रय दिला होता. तसेच अन्न आणि लॉजिस्टिकल सपोर्ट पुरवला होता. दहशतवाद्यांनी या ठिकाणी राहूनच पर्यटन स्थळाची रेकी केली होती. तसेच धर्म विचारुन हत्या केली होती. त्यात २६ पर्यटकांचा मृत्यू झाला. राष्ट्रीय तपास संस्थेने म्हटले की, परवेज अहमद जोथर आणि बशीर अहमद जोथर या दोघांना बेकायदेशीर कारवाया (प्रतिबंध) कायदा, १९६७ च्या कलम १९ अंतर्गत अटक करण्यात आली आहे.

## बापाने केला पोटच्या मुलाचा खून

**फत्तेपूर, ता.जामनेर ।** येथून जवळच असलेल्या कसबा-पिंप्री येथील पंचवीस वर्षीय विवाहीत तरुणाचा कौटुंबिक कलहातून बापाने मुलाचा जीव खून केल्याने या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडालेली आहे. या प्रकरणात बापाला पोलिसांनी अटक केलेली आहे.



**कसबा-पिंप्री येथील घटनेने एकच खळबळ**

याबाबत पोलीसांनी दिलेली माहिती अशी की,कसबा-पिंप्री येथील पंचवीस वर्षीय तरुण शुभम धनराज सुरडकर यांचा मृतदेह गांवापासून एक किमी अंतरावर शेख करीम शेख रऊप यांच्या शेताच्या बांधावर रस्त्याच्या कडेल आढळून आला. सकाळी रनिंग करणेसाठी गेलेल्या तरुणाना हा मृतदेह दिसला. त्यांनी ही माहिती पोलीस पाटील समद तडवी यांना दिली.त्यांनी पोलीसाना घटनेची माहिती दिली.

फत्तेपूर पोलीस स्टेशनचे सहा.पो.नि. अंकुश जाधव यांनी आपल्या सहकाऱ्यासह घटनास्थळी धाव घेतली.मृतदेहाची पाहणी केली असता मृताच्या डोक्या वर कठीण शस्त्राने मारल्याचे व मृतदेह अज्ञातानी या ठिकाणी आणून टाकलेला असल्याचे प्रथम दर्शनी लक्षात येताच तरुणाचा खून झाल्याचा संशय आला.

पोलिसांनी तपासचक्रे फिरविलीअसता शुभम यास दारूचे व्यसनअसल्यामुळे तो आई-वडील,भाऊ-बहीन,पत्नी यांना वारंवार त्रास देऊन वाद निर्माण करीत असे.त्यांच्या त्रासाला सर्वच कुटुबीय कंटाळले होते.काल रात्री दि.२१ जून रोजीही घरात वाद करून हाताने काच फोडला होता. पान २ वर

## रक्षा खडसेंनी केला सायकल दिंडीचा शुभारंभ

**पंढरपूर ।** आषाढी वारीसाठी विविध संतांच्या पालख्यांनी पंढरीला प्रस्थान ठेवले आहे. अशीच मात्र थोडी वेगळी अनोखी दिंडी पंढरपुरातून काढण्यात आली होती. राज्यातून ८० शहरांतील जवळपास ४ हजार सायकलस्वारांची दिंडी पंढरीत पोहोचली होती. अध्यात्माबरोबरच शारीरिक तंदुरुस्तीचा संदेश या माध्यमातून देण्यात आला असून, सायकलस्वारांना जी काही मदत लागेल ती मदत माझ्या मंत्रालयाकडून देवू, असे केंद्रीय क्रीडा, युवक कल्याण राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी सांगितले.

## अमेरिकेचा इराणवर 'बॉम्ब' हल्ला

**शिकागो ।** अमेरिकेने इराणच्या तीन आण्विक केंद्रांवर हल्ले केले आहेत. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनीच या हल्ल्यांची पुष्टी केली आहे. फोर्डो, नतांज, इस्फहान या भागात असलेल्या आण्विक केंद्रांवर हे हल्ले करण्यात आले आहेत. दरम्यान, इराण आणि इराक यांच्या युद्धात अमेरिकेने उडी घेतल्यामुळे संपूर्ण जगाची चिंता वाढली आहे. अमेरिकेच्या या धोरणामुळे मध्य-पूर्वेतील संघर्ष आणखी वाढण्याची शक्यता आहे. याच कारणामुळे इंधन, नैसर्गिक वायू यांचा भाव गगनाला भिडण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




**ट्रम्प यांच्यामुळे अख्खे जग होरपळणार**

इस्त्रायल-इराण यांच्यातील युद्धामुळे एका आठवड्यात ब्रेंड क्रूड ऑईलची किंमत तब्बल १८ टक्क्यांनी वाढली आहे. ब्रेंट क्रूड ऑईलची किंमत आता ७५ डॉलर्स प्रति बॅरलच्या आसपास पोहोचली आहे. अमेरिकेनेही इराण-इस्त्रायल यांच्यातील युद्धात उडी घेतल्यामुळे आता कच्च्या तेलाची किंमत आणखी वाढण्याची शक्यता आहे. तज्ज्ञांच्या मते हा संघर्ष आणखी वाढला तर कच्च्या तेलाची किंमत प्रति बॅरल १२० डॉलर्सपर्यंत पोहोचू शकते.

**निर्यातीसाठी खर्च, वेळ वाढणार**

इस्त्रायल आणि इराण यांच्यतील युद्धामुळे होरमूज जलडमरुमध्य या भागाला हाय रिस्क झोन म्हणून घोषित करण्यात आले आहे. याच भागातून जास्तीत जास्त कच्च्या तेलाची निर्यात केली जाते. होरमूज हा भाग हाय रिस्क पान २ वर

## पूर्वी भाजपा तत्वावर चालत होती

**पंढरपूर ।** पूर्वीची भाजप ही भ्रष्टाचारमुक्त आणि गुन्हेगारमुक्त अशा चौकटीतील होती, तत्वावर चालत होती,अगदी एकनाथ खडसेंवर भ्रष्टाचाराचा आरोप झाल्यानंतर तातडीने मंत्रीपदाचा राजीनामा घेतला होता. मात्र, आता जेलमध्ये जाऊन आलेले किंवा ईडी चौकशीत अडकलेले लोक पक्षात घेतले जात आहेत. अगदी दाऊदचा हस्तक असलेला सलीम कुत्तासोबत नाचणाऱ्या सुधाकर बडगुजरला देखील भाजपमध्ये घेतले हे अति झाले, अशा शब्दात राष्ट्रवादीचे आमदार आणि पूर्वाश्रमीचे भाजपचे ज्येष्ठ नेते एकनाथराव खडसे यांनी भाजप नेतृत्वावर खरमरीत टीका केलीय. भाजपमध्ये आज ९०% लोक हे बाहेरचे असून विविध आरोप झालेले असल्याची टीका खडसे यांनी केली.



**आ.खडसेंची पंढरपुरातून खरमरीत टीका**

पंढरपूरमध्ये विठुरायाचे दर्शन घेण्यासाठी आ.एकनाथ खडसे आले होते, तेव्हा त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. ज्या भ्रष्ट नेत्यांच्या विरोधात मी विरोधी पक्ष नेता असताना टीका केली होती, ते आज पक्षात असून ७० हजार कोटी रुपयांच्या भ्रष्टाचाराचे आरोप देवेंद्र फडणवीस यांनी केले होते, तेही आज यांच्यासोबत आहेत, असा टोला खडसेंनी मुख्यमंत्र्यांना लगावला. विशेष म्हणजे आजच त्यांच्या सुनबाई आणि केंद्रीय क्रीडा मंत्री रक्षा खडसे यादेखील पंढरपूरमध्ये आल्या होत्या. त्या पंढरपुरातून गेल्यानंतर दुपारी आ.खडसे हेही पंढरपूरमध्ये आले. यावेळी बोलताना, भाजप हा विषय माझ्यासाठी पूर्णपणे संपला असून मी अंधारात असताना मला साथ देणाऱ्या शरद पवार पान २ वर

**आमने-सामने**

## खडसे भाजपामध्ये येण्यासाठी कासावीस

**नागपूर ।** सुधाकर बडगुजर यांनी भाजपमध्ये प्रवेश केल्यावर आ.एकनाथराव खडसे म्हणाले की बडगुजर यांच्यापेक्षा मी वाईट नाही. मला का भाजपात घेत नाही. यातून खडसे पक्षात येण्यासाठी किती उत्सुक आहे हे दिसत आहे, असा टोला महाजन यांनी लगावला आहे. गिरीश महाजन पुढे बोलताना म्हणाले, मी लहान कार्यकर्ता आहे. एकनाथ राव खडसे थेट दिल्लीतील नेत्यांशी बोलतात, त्यांचे कनेक्शन दिल्लीत आहे. मी त्यांच्याबद्दल काही टिपणी करणार नाही. ते राष्ट्रीय नेते आहे, असेही उपरोधिक भाष्य महाजन यांनी केले आहे. एकनाथ राव खडसे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कार्यक्रमाला आले होते. याबद्दल महाजन म्हणाले, त्यांचे नाव पत्रिकेत घेत नव्हते. पण ते येऊन गेले.



**महाजनांनी दुखरी नस दाबत डिवचले!**

दरम्यान, गिरीश महाजन यांनी नागपुरात विविध विकासकामांची माहिती दिली. यात कुंभमेळ्यासाठी रस्त्यांची कामे, नाशिक रिंग रोड आणि जळगाव ते संभाजीनगर दरम्यानच्या मार्गांचा समावेश आहे. हिंदी भाषेच्या सक्तीवर मुख्यमंत्री उत्तर देतील असे ते म्हणाले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कामाचा ट्रेलर असून अजून बरंच काही बाकी आहे, असेही त्यांनी सांगितले.

कुंभमेळ्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी होण्याची शक्यता आहे. त्यामुळे रस्त्यांची कामे वेळेत पूर्ण करण्याची गरज आहे. नाशिक आणि सिन्नर दरम्यानचा रस्ता रुंद केला जाणार आहे. तसेच, नाशिककडे येणाऱ्या पान २ वर

## भास्कर जाधवांकडून निवृत्तीचे संकेत



**रत्नागिरी ।** आठ वेळा निवडणूक जिंकल्यानंतर थांबायचा विचार करावा असे वाटते, असे म्हणत शिवसेना नेते आणि माजी मंत्री भास्कर जाधव यांनी राजकीय संन्यास घेण्याचे संकेत दिले आहेत. राज्यात मविआ सरकार असताना, शिवसेना पक्षातून आपल्याला मंत्रिपदाची संधी मिळाली नाही, याबाबतची खंतही भास्कर जाधव यांनी आज बोलून दाखवली. तसेच, खा.संजय राऊत यांच्या वक्तव्यावर नाराजी दर्शवत मला शिवसेना पक्षात भाषणं करायची संधी मिळते, मी कुणाची हुजरेगिरी कर नाहीत, असे म्हणणारा मी कार्यकर्ता आहे, असे ते म्हणाले.

**केळी भाव**

| | |
|---|---|
| नवती (१) | : 2200 |
| नवती (२) | : 2000 |

**मिरकीली**




